# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# नागपूर विभागीय मंडळ, नागपूर.

अत्यंत महत्वाचे

पत्र क्रमांक : नाविमं/पउमा/योग्यता/३१४८

नागपूर, दिनांक : ०१/०६/२०१७

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक

सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,

नागपूर विभाग, नागपूर.

विषय :- सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षातील महाराष्ट्राबाहेरील राज्यातून/परदेशातून या विभागातील मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्रासाठी मंडळाकडे अर्ज सादर करणे बाबत.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, योग्यता प्रमाणपत्र देण्याबाबतची कार्यपध्दती यापूर्वीच कळविण्यात आली असली तरी सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षाकरीता राज्य मंडळामार्फत सुचविण्यात आलेले बदल पुनःश्च खाली नमूद करण्यात येत आहेत.

१) जे विद्यार्थी महाराष्ट्र राज्याबाहेरुन / परदेशातून या विभागातील संलग्न कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश घेण्यास इच्छूक असतील त्यांनी सर्वप्रथम या मंडळातून योग्यता प्रमाणपत्राचा निर्धारित अर्ज परप्रांताकरीता शुल्क रुपये १००/- व परदेशाकरीता रु. ५००/- रोखीने/चलनाद्वारे भरणा करुन प्राप्त करावा व ज्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश घ्यावयाचा असेल त्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्याकडे प्रवेश घेतेवेळी आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करावा. अशा सूचना महाविद्यालयाने प्रवेशासाठी दिल्या जाणाऱ्या माहिती पत्रकामध्ये (PROSPECTUS) नमूद कराव्यात.

२) कार्यालयाचे संदर्भांकित पत्र क्रमांक : रा.मं./समकक्षता/५४२०, दिनांक १६/०८/२००५ नूसार समकक्षता यादी सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना पाठविलेली आहे. तसेच मंडळ कार्यालयात विक्रीस उपलब्ध "लोकाभिमुख प्रशासन नागरी सनद व माहिती पुस्तिका" या पुस्तिकेत अधिकृत समकक्षता यादी प्रकाशित केलेली आहे. तसेच अद्ययावत समकक्षता यादी मंडळाच्या www.mahahsscboard.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून सदर यादीचे अवलोकन व्हावे. या समकक्षता यादीवरुन विद्यार्थी कोणत्या इयत्तेत प्रवेशास पात्र ठरतो, हे प्रथमतः निश्चित करावे. समकक्षतेप्रमाणे इयत्ता जुळते की नाही याची खात्री झाल्यानंतरचयोग्य त्या इयत्तेत विद्यार्थ्यास प्रवेश देण्यात यावा, व त्यानंतरच विभागीय मंडळाकडे योग्यता प्रमाणपत्रासाठी सर्व कागदपत्रे खालील अनुक्रमांक ७ मध्ये दर्शविलेल्या दिनांकास किंवा तत्पूर्वी हस्तपोच पाठवावेत.

३) इयत्ता **11** वी गणित विषयासह विज्ञान शाखा प्रवेशाकरिता इ.**10** वी विज्ञान विषयासह गणित विषयात किमान **35%** गुण अनिवार्य आहे. इ. **10** वी परीक्षा सामान्य गणित विषयात उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यास कुठल्याही शाखेतील गणित विषयाला इ. **11** वी ला प्रवेश देण्यात येऊ नये. तसेच कनिष्ठ महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना योग्यता प्रमाणपत्रांबाबत खालील महत्वाच्या कागदपत्राची पूर्तता होणे आवश्यक आहे.

अ) योग्यता प्रमाणपत्राकरिता नविन विहीत नमुन्यातील अर्ज (विहीत नमुन्याची सत्यप्रत स्विकारली जाणार नाही.) (Application Form of Eligibility Certificate)

ब) उत्तीर्ण गुणपत्रिका (इ. १२ वी करीता इ. १० वी व ११ वी ची गुणपत्रिका (Marklist) इंग्रजी विषयासह पाच विषयात उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे.) इंग्रजी विषयात अनुत्तीर्ण असणाऱ्या व इंग्रजी विषय नसलेल्या विद्यार्थ्यास प्रवेश दिल्यास मंडळातर्फे योग्यता प्रमाणपत्र दिले जाणार नाही व विद्यार्थ्याच्या शैक्षणिक नुकसानीची त्याची सर्वस्वी जबाबदारी कनिष्ठ महाविद्यालयाची राहील.

क) उत्तीर्णता प्रमाणपत्र (इ. ११/१२ वी करिता इ. १० वी चे प्रमाणपत्र.(Passing certificate / Provisional Passing Certificate)

ड) शाळा सोडल्याचा दाखला. (दाखल्यावर संबंधित इयत्ता १० वी व इयत्ता ११ वी विद्यार्थ्यांना उत्तीर्ण केलेल्या ठिकाणी असलेल्या शिक्षणाधिकारी / शिक्षण निरिक्षक यांची प्रतिस्वाक्षरी)
(School Leaving / Transfer Certificate with Counter Signature By appropriate Education Officer / Authority)

इ) मूळ स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate in Original)

ई) परिशिष्ट 'अ' (विदेशी विद्यार्थी करिता) योग्यता प्रमाणपत्र अर्ज पृष्ठ क्र. ४ भरावे.
(Appendix A for foreign students )

उ) कनिष्ठ महाविद्यालयाने संबंधित विद्यार्थ्यांकडून मंडळाच्या योग्यता प्रमाणपत्र अर्जासोबत देण्यात आलेल्या विहीत नमुन्यातील हमीपत्र (Deed of Undertaking) पेपरवर करुन घेणे.
(मूळ स्थलांतर प्रमाणपत्र, हमीपत्र व परिशिष्ट "अ" शिवाय कोणतीही महत्वाची कागदपत्रे अर्जासोबत जोडण्यात येवू नये. उर्वरित कागदपत्राच्या स्वप्रमाणित केलेल्या छायाप्रती) (Self Attested Copy) अर्जासोबत देण्यात याव्यात.

ऊ) NIOS राष्ट्रीय मुक्त विद्यालय / इतर मुक्त विद्यालय / विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांकरीता वरील कागदपत्रांव्यतिरिक्त (Enrolment Certificate) नोंदणी प्रमाणपत्र / Identity Card ची झेरॉक्स प्रत व पूर्वीच्या शाळेची T.C. असणे आवश्यक आहे.

४) कनिष्ठ महाविद्यालयानी योग्यता प्रमाणपत्राचे अर्ज नियमित शुल्कासह दिनांक : १६ ऑगस्ट व १५ सप्टेंबर २०१७ पर्यंत, या दोन टप्प्यामध्ये मंडळाकडे हस्तपोच पाठविण्यात यावेत. टपालाद्वारे (By Post) पाठविलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच अपूर्ण माहिती असलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. अर्जामध्ये विद्यार्थ्यांनि शाखा (Stream) स्पष्ट नमूद करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेले योग्यता प्रमाणपत्र सर्व अर्ज संपूर्ण प्रमाणपत्रांच्या प्रतीसह टॅग मध्ये एकत्र बांधून प्रत्येक अर्जावर मुद्रित करण्यास आलेल्या जागे समोर ०१ पासुन अनुक्रमांक लिहून द्यावेत. प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची यादी सोबत जोडलेल्या नमुना फॉर्म मध्ये भरुन पाठवावी.

५) इतर राज्यातून / मंडळातून आलेले जे विद्यार्थी इ. १२ वी मध्ये प्रवेश घेतात त्यांचे योग्यता प्रमाणपत्राचे अर्ज दिनांक १५ सप्टेंबर पूर्वी मंडळाकडे सादर करणे आवश्यक आहे. तसेच विषयाचे संयुक्तीकरण चुकीचे (Wrong Subject Combination) होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी.

६) योग्यता प्रमाणपत्रासाठी विद्यार्थ्यांकडून घ्यावयाचे नियमित शुल्क (इ. ११ वी / १२ वी)
१) महाराष्ट्राबाहेरील राज्यातून येणाऱ्या विद्यार्थ्यासाठी प्रत्येकी रुपये ३००/-
२) परदेशातुन येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी रुपये ५००/-

७) कनिष्ठ महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्राचे अर्ज नियमित / विलंब / अतिविलंब शुल्कासह मंडळाकडे सादर करावयाच्या तारखा खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| अ) | नियमित शुल्कासह अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख | १६ ऑगस्ट व १५ सप्टेंबर-२०१७ |
| ब) | विलंब शुल्क रुपये १००/- प्रती विद्यार्थी | १६ सप्टेंबर ते १५ नोव्हेंबर-२०१७ |
| क) | अति विलंब शुल्क रुपये १०/- प्रतीदिन प्रती विद्यार्थी व संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाकडून प्रती विद्यार्थी रु. १०००/- दंड वसूल करण्यात येईल | १६ नोव्हेंबर पासून कागदपत्राच्या त्रुटींची पूर्तता करेपर्यंत |

८) दिनांक १६ नोव्हेंबर नंतर सर्वसाधारणपणे अर्ज स्विकारण्यात येणार नाही, परंतु प्रत्येक विद्यार्थ्याची अशी वैयक्तिक प्रकरणिका पाहून अशा विद्यार्थ्यांचे अर्ज स्विकारावयाचे किंवा नाही या संबंधिचे अधिकार विभागीय अध्यक्ष यांना राहतील, हे अर्ज स्विकारतांना प्रत्येक विद्यार्थ्यांकडून विलंब शुल्क रुपये १००/- अतिविलंब शुल्क रुपये १०/- प्रती दिन याप्रमाणे शुल्क घेण्यात यावे तसेच प्रती विद्यार्थी रुपये १०००/- दंडाची रक्कम कनिष्ठ महाविद्यालयाने भरावयाची आहे.

९) अंतिम योग्यता प्रमाणपत्रासाठी आवश्यक त्या उर्वरित कागदपत्रांची पुर्तता करण्यासाठी (इ. ११ वी व १२ वी) २० जानेवारी २०१८ ही अंतिम मुदत असेल. मात्र त्यानंतर खालील **"ब"** प्रमाणे अतिविलंब शुल्क आकारण्यात येईल.

अ) उर्वरित आवश्यक कागदपत्राची पूर्तता करण्यासाठी : अंतिम तारीख २० जानेवारी-२०१८ (इ. ११ वी/१२ वी)

ब) विलंब शुल्क प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी रुपये ५/- प्रतीदिन : २१ जानेवारी ते ३० ऑगस्ट-२०१८ तसेच संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाकडून प्रती विद्यार्थी रुपये १००/- दंड वसुल करण्यात येईल. दि ३० ऑगस्ट-२०१८ पर्यंत उर्वरित प्रमाणपत्राची पूर्तता न केल्यास संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश व संपादणूक / निकाल रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

१०) योग्यता प्रमाणपत्रासाठी पात्र नाही अशा विद्यार्थ्यांना अंतिम योग्यता प्रमाणपत्र दिले जाणार नाही अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश त्वरीत रद्द करण्यात यावेत. कोणत्याही परिस्थितीत त्यांची इ. १२ वी परिक्षेची आवेदनपत्रे भरु नयेत. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मंडळ कार्यालयात त्वरीत सादर करावा.

११) अंतिम योग्यता प्रमाणपत्रासाठी उत्तीर्णता प्रमाणपत्र विलंबाने प्राप्त होणार असल्यास अशा परिस्थितीमध्ये संबंधित मंडळाचे तात्पुरते उत्तीर्णता प्रमाणपत्र (Provisional Passing Certificate) ग्राह्य धरण्यात येईल.

**महत्वाचे :-**

१२) ज्या विद्यार्थ्यांनी आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता केलेली नाही. अशा विद्यार्थ्यांचा इयत्ता ११ वी च्या परिक्षेचा निकाल कनिष्ठ महाविद्यालयाने जाहीर करु नये. तसेच अशा विद्यार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीत इयत्ता १२ वी च्या वर्गात पुढील वर्षी प्रवेश देवू नये.

१३) मंडळाकडे तयार असलेली अंतीम योग्यता प्रमाणपत्रे संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाने तातडीने निर्धारित मुदतीमध्येच मंडळाकडून हस्तपोच अथवा समक्ष प्राप्त करुन घ्यावेत. मंडळाकडून विलंबाने प्रमाणपत्रे प्राप्त केल्यामुळे होणाऱ्या अडचणीस मंडळ जबाबदार राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

१४) मंडळाने निर्धारित केलेल्या दिनांका नंतर कोणत्याही प्रकारचे योग्यता प्रमाणपत्राचे अर्ज किंवा त्या संदर्भातील कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत. तसेच पोस्टाद्वारे प्राप्त झालेले योग्यता प्रमाणपत्राचे अर्ज किंवा कागदपत्रे मंडळातर्फे स्विकारली जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. विभागीय मंडळाच्या सूचनाव्यतिरिक्त कनिष्ठ महाविद्यालयांनी नियमबाह्य कृती केल्यास रुपये १०००/- दंड आकारण्यात येईल.

१५) राज्याबाहेरील/देशाबाहेरील विद्यार्थी इयत्ता १२ वी मध्ये प्रवेश घेण्यास इच्छूक असतील त्यांनी दिनांक १५ सप्टेंबर पूर्वी प्राचार्यामार्फत मंडळाकडे योग्यता प्रमाणपत्राकरिता अर्ज सादर करणे अनिवार्य राहील. मात्र विशेष परिस्थितीत पालकांची बदली १५ सप्टेंबर नंतर इतर राज्यामधून बदलून आल्याचा उचित पुरावा सादर केल्यास अशा विद्यार्थ्यांकडून अनुक्रमांक ७ प्रमाणे विलंब शुल्क व अनुक्रमांक ८ प्रमाणे अतिविलंब शुल्क आकारुन अर्ज स्विकारण्यात येतील.

१६) इयत्ता १२ वीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याकरिता कागदपत्राची पूर्तता करण्यासाठी अनुक्रमांक ९ प्रमाणे अंतीम तारीख राहील. या कालावधीत त्यांचेकडून पूर्तता न झाल्यास अनुक्रमांक ९ प्रमाणे दंड आकारण्यात येईल. सदर मुदतीत कागदपत्राची पूर्तता न केल्यास त्यांचे परीक्षेचे आवेदनपत्र रद्द करण्यात येईल व त्यास लेखी परीक्षेपासून वंचित व्हावे लागेल. याबाबतची लेखी स्वरुपात विद्यार्थ्यास जाणीव करुन देण्यात यावी व त्याची नोंद दप्तरी जतन करुन ठेवावी.

१७) राज्याबाहेरील/देशाबाहेरील खाजगी विद्यार्थ्यांनी फॉर्म नं. १७ सोबत योग्यता प्रमाणपत्राचा अर्ज सादर करणे अनिवार्य आहे.

१८) राज्य मंडळ, पुणे, दिनांक २१ नोव्हेंबर, २००६ च्या पत्र क्रमांक रा. मं./परीक्षा-३/९६९१ अन्वये परराज्यातील खाजगी विद्यार्थ्यांना सुद्धा नोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) घेतेवेळी त्यांच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन योग्यता प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे.

१९) इयत्ता ११ वी व १२ वी मधील नियमित विद्यार्थ्यांचे प्रवेश शिक्षण उपसंचालक यांनी ठरवून दिलेल्या निकषानुसार व माध्यमिक शाळा संहिता नियमावली १९८६ मधील नमूद नियमानुसार असणे आवश्यक राहील यांची नोंद घ्यावी.

सदरहू परिपत्रकातील क्रमांक १ ते १९ मध्ये दर्शविण्यात आलेल्या सूचनेप्रमाणे आपण आपल्या स्तरावर योग्य ती काळजी घेऊन व विद्यार्थ्यास मार्गदर्शन करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी वरील माहिती ही विद्यार्थ्यांना कळविण्यात यावी व सूचना फलकावर लावावी. तसेच सूचना मिळाल्याची स्वाक्षरी संबंधित विद्यार्थ्याकडून घेण्यात यावी व आपल्या दप्तरी जतन करुन ठेवावी.

**महत्वाची टिप :-**

१) परप्रांत/परदेशातील विद्यार्थ्यांना इ. ११ वी व १२ वी मध्ये प्रवेश देतांना योग्यता प्रमाणपत्र अर्ज भरुन घेणे आवश्यक आहे. योग्यता प्रमाणपत्र अर्ज विद्यार्थ्यांकडून भरुन न घेतल्यास संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील.

२) योग्यता प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याकरिता संबंधित कनिष्ठ महाविद्यालय प्राचार्यांनी कनिष्ठ महाविद्यालयातील योग्यता प्रमाणपत्र अर्जाचे काम करणाऱ्या <u>लिपीकासच</u> मंडळ कार्यालयात पाठवावे.

पांडुरंग रा. पवार
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

**प्रतिलीपी :-**

१) सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे.

२) शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचे माहितीकरीता व पुढील कार्यवाहीकरीता समादराने अग्रेषित आपणास कळविण्यात येते की, राज्याबाहेरील व देशाबाहेरील विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी, १२ वी मध्ये प्रवेश देण्यासंबंधीच्या या परिपत्रकाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासंबंधिच्या सूचना कनिष्ठ महाविद्यालये सुरु होण्यापूर्वी आपले कार्यालयामार्फत पुनःश्च देण्यात याव्यात.

३) शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद, नागपूर/भंडारा/गोंदिया/चंद्रपूर/वर्धा/गडचिरोली यांना माहितीस्तव अग्रेषित. त्यांनीही त्यांच्या स्तरावर योग्य ती खबरदारी घेऊन मंडळास सहकार्य करावे.

# REGISTER FOR THE ELIGIBILITY - YEAR 2017-18

College Index No. ......................................................................................, Phone No. ..........................

| Sr. No. | Date of Admission | Name of Candidate | | | Name of the Board | Indian / Foreigner | S.S.C. Marksheet | School Leaving Certificate | S.S.C. Passing Certificate | Original Migration Certificate | XI Marksheet | College L.C. and Appendix A | Deed of undertaking | Verification |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Sur-name | Mid-Name | Father's Name | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| | | | | | | | | | | | | | | |

सूचना : १) (✓) XI/XII खाजगी XII स्वतंत्र तक्ता भरावा.

२) क्रमांक १ ते ८ कॉलम भरताना कागदपत्रे असल्यास 'Yes' व नसल्यास 'No' लिहावे.

३) तक्ता आडनाव, नाव व वडिलांचे नाव या क्रमाने भरावा.

Signature & Seal of
Head of Jr. College